**अपंग कर्मचा-यांना गट-क आणि गट-ड मधील पदांवर पदोन्नतीमध्ये ३% आरक्षण विहित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र.: एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ५ मार्च,२००२.

संदर्भ :- १) केंद्र शासनाचे क्र.३६०३५/८/८९-Estt. (SCT) दि. २०.११.१९८९ चे कार्यालयीन ज्ञापन.
२) केंद्र शासनाचे क्र.३६०३५/७/९५-Estt (SCT) दि. १८.२.१९९७ चे कार्यालयीन ज्ञापन.
३) केंद्र शासनाचे क्र.३६०२५/०३/९७-Estt (Res) दि. ४.७.१९९७ चे कार्यालयीन ज्ञापन.

## शासन निर्णय

केंद्र शासनाने त्यांच्या दि.२०.११.१९८९ च्या कार्यालयीन ज्ञापनाद्वारे अपंग कर्मचा-यांना गट-क मधून गट-क मधील, गट-ड मधून गट-ड मधील आणि गट-ड मधून गट-क मधील, नियुक्ती करीता योग्य ठरविलेल्या पदांवर (Identified posts) पदोन्नतीमध्ये ३% आरक्षण विहित केले आहे. तसेच दिनांक १८ फेब्रुवारी, १९९७ आणि दि.४ जुलै, १९९७ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये याबाबतची कार्यपध्दती विहित केली आहे. केंद्र शासनाप्रमाणे राज्य शासकीय / निमशासकीय सेवेत गट-क आणि गट-ड मधील नियुक्तीसाठी योग्य ठरविलेल्या पदांवर (Identified Posts) अपंग कर्मचा-यांना पदोन्नतीमध्ये ३% आरक्षण विहित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. केंद्र शासनाच्या धोरणास अनुलक्षून शासन असे आदेश देत आहे की, राज्य शासनाच्या सेवेतील गट-क व गट-ड मधील अंध/अल्पदृष्टी (Visually Handicapped), कर्णबधीर आणि अस्थिव्यंग या अपंग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीत प्रत्येकी १% याप्रमाणे एकूण ३% आरक्षण विहित करण्यात यावे. पदोन्नतीमधील हे आरक्षण गट-क मधुन गट-क मधील पदांसाठी, गट-ड मधुन गट-ड मधील पदांसाठी आणि गट-ड मधुन गट-क मधील पदांसाठी अपंगांच्या नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांकरीता (Identified Posts) असेल. अपंग कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीसाठी विचार करतांना शासनाने वेळोवेळी विहित केलेले पदोन्नतीसंबंधातील नियम, आदेश व निकष (उदा. पदोन्नती लगतच्या पदावरील किमान सेवेचा कालावधी, विहित विभागीय / सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा, गोपनीय अहवाल, इ.) यानुसार कार्यवाही करण्यात यावी. पदोन्नती संदर्भात क्रमवार बिंदू नामावली व कार्यपध्दती या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविण्यात आली आहे.

३. हे आदेश या शासन निर्णयाच्या दिनांकापासून शासकीय सेवा, सर्व शासकीय मंडळे/महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका आणि शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे, अनुदानीत संस्था यांना लागू होतील. तथापि

जिल्हाधिकारी कार्यालय
30 MAR 2002
...लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

ज्या प्रकरणी पदोन्नतीची प्रक्रीया या आदेशाच्या दिनांकापूर्वी सुरु झाली असेल त्या प्रकरणी हे आदेश
होणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(द.दा.देशपांडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,

**शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ, दि. ५ मार्च, २००२ चे परिशिष्ट**

**अपंग कर्मचा-यांना गट-क मधून गट-क मधील, गट-ड मधून गट-ड मधील आणि गट-ड मधून गट-क मधील पदोन्नती व क्रमवार बिंदू नामावली वापरण्यासंबंधीची कार्यपध्दती :-**

१) **अ)** विभाग प्रमुख कार्यालय प्रमुख यांनी १) अंध / अल्पदृष्टी (Visually Handicapped), २) कर्णबधीर आणि ३) अस्थिव्यंग या प्रवर्गातील अपंग कर्मचा-यांना **गट-क मधून गट-क मधील, गट-ड मधून गट-ड मधील आणि गट-ड मधून गट-क मधील** नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांवर (Identified Posts) पदोन्नतीमध्ये ३ % पर्यन्त आरक्षण देण्यासाठी १०० रिक्त पदांची [ नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांची (Identified Posts) ]पदनिहाय स्वतंत्र नोंदवही ठेवावी. त्यामधील क्र.१, ३४ व ६७ हे बिंदू अपंगांसाठी आरक्षित करण्यात यावेत. विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी क्रमांक १ वर मूळ संवर्गातील (Feeder Cadre) कोणत्याही एका अपंग प्रवर्गाच्या जेष्ठतम कर्मचाऱ्यांचा प्रथम विचार करावा. म्हणजेच जर मूळ संवर्गामधील (Feeder Cadre) जेष्ठतम कर्मचारी अस्थिव्यंग प्रवर्गातील असेल तर नोंदवहीतील क्रमांक १ हा बिंदू त्यांच्या पदोन्नतीकरीता वापरण्यात यावा. तथापि अपंगांच्या (अंध/अल्पदृष्टी,कर्णबधीर व अस्थिव्यंग) विविध प्रवर्गासाठी योग्य प्रकारे आरक्षण आळीपाळीने राहील याची विभाग प्रमुखांनी खात्री करणे आवश्यक आहे. अपंग कर्मचा-यांस त्यांच्या अपंग प्रवर्गानुसार, त्यांना नोंदवहीत आरक्षित केलेल्या बिंदूनुसार पदोन्नती देताना त्यास त्याच्या सामाजिक आरक्षण/खुल्या प्रवर्गानुसार (उदा.अ.जा.,अ.ज.,खुला) बिंदु नामावली (Roster)मध्ये दर्शविण्यात यावे.

**उदा.** जर एखादया वर्षात अपंग कर्मचा-यांकरीता क्रमवार बिंदु नामावलीनुसार दोन पदे आरक्षित करण्यात आली असतील आणि या दोन पदांपैकी एका पदावर अनुसूचित जाती व अन्य पदावर खुल्या प्रवर्गातील अपंग कर्मचा-यांची पदोन्नतीने नेमणूक करण्यात आली असेल, तर अनुसूचित जातीच्या अपंग कर्मचा-यांस बिंदूनामावलीत अ.जा बिंदूवर आणि खुल्या प्रवर्गातील अपंग कर्मचा-यांस खुल्या प्रवर्गासमोर दर्शविण्यात यावे.

काही प्रकरणी जर पदोन्नतीकरीता उपलब्ध असलेली रिक्त पदे कमी असतील आणि यापैकी एकही रिक्त पद अनुसूचित जाती किंवा अनुसचित जमातीच्या आरक्षित बिंदूसमोर दर्शविण्यात आले नसेल, परंतु नोंदवहीतील बिंदूनुसार त्यापैकी एक रिक्त पद अपंग कर्मचा-याकरिता आरक्षित केले असेल आणि पदोन्नतीकरीता उपलब्ध असलेला अपंग कर्मचारी सामाजिक आरक्षणानुसार (मागासवर्गीय) राखीव प्रवर्गातील असेल, तर त्यानंतर उपलब्ध असलेला रोस्टरवरील बिंदू (संबंधित मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेला) संबंधित अपंग प्रवर्गासाठी आरक्षित अपंग उमेदवारास समायोजित (Adjusting) करण्यासाठी वापरण्यात यावा.

**उदा.** जर उपलब्ध तीन रिक्त पदे पदोन्नतीच्या बिंदूनामावतील बिंदू क्रमांक ८,९,१० या खुल्या प्रवर्गासमोर दर्शविण्यात आली. त्यापैकी १ रिक्त पद अपंग कर्मचा-यांसाठी नोंदवहीतील बिंदूनुसार आरक्षित आहे आणि जर अपंग प्रवर्गानुसार निवड केलेला कर्मचारी अनुसूचित जातीचा असेल तर त्याला त्यानंतर उपलब्ध होणा-या अनुसूचित जातीच्या बिंदूसमोर बिंदूनामावलीत क्रमांक १२ वर दर्शविण्यात येवून समायोजित करावे.

**ब)** अपंगासाठी रिक्त असलेली पदे, पदोन्नती आणि निवडीने (By Selection) भरताना सर्वसाधारण पदोन्नती क्षेत्रातील अपंग कर्मचा-यांचा विचार करावा.मात्र जेथे संबंधित अपंग प्रवर्गानुसार पुरेसे अपंग कर्मचारी सर्वसाधारण पदोन्नती क्षेत्रात उपलब्ध नसतील, तेथे सर्वसाधारण पदोन्नती क्षेत्र ५ पट वाढवावे आणि त्यानुसार उपलब्ध होणा-या अपंग कर्मचा-यांचा विचार करावा. परंतु सर्वसाधारण

पदोन्नती क्षेत्र वाढवूनही अपंग कर्मचारी उपलब्ध झाले नाहीत, तर हे आरक्षण पुढील तीन भरती वर्षाकरीता पुढे ओढावे व नंतर व्यपगत करावे. मात्र सदर रिक्त पद/पदे नियुक्तीस योग्य ठरविलेल्या (Identified Posts) अन्य अपंग प्रवर्गात अदलाबदलीने बदलून, पदोन्नतीसाठी सदर अपंग प्रवर्गाच्या कर्मचा-यांचा विचार करावा.

**क)** अपंगांकरीता जे पद / पदे पदोन्नती देवून (Promotion by Non-selection) पदोन्नतीने भरावयाचे आहे, त्याकरीता सुयोग्य अपंग कर्मचा-यांचा अपंग प्रवर्गानुसार आरक्षित पदाकरीता पदोन्नतीसाठी विचार करावा. जर अपंग प्रवर्गानुसार अपंग कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र / उपलब्ध झाला नाही, तर हे आरक्षण पुढील तीन भरती वर्षाकरीता पुढे ओढावे व नंतर व्यपगत करावे. मात्र सदर रिक्त पद/पदे नियुक्तीस योग्य ठरविलेल्या (Identified Posts) अन्य अपंग प्रवर्गात अदलाबदलीने बदलून, पदोन्नतीसाठी सदर अपंग प्रवर्गाच्या कर्मचा-यांचा विचार करावा.

**ड)** ज्या गट/संवर्गात सरळ सेवेने करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण ७५%पेक्षा जास्त नसेल,अशाच गट / संवर्गामध्ये अपंग कर्मचा-यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण राहील.

२. पदोन्नतीमध्ये आरक्षण विहित करतांना केंद्र शासनाच्या दि.२०.११.८९ च्या आदेशातील खालील मुद्यांचाही विचार करण्यात यावा.

"ज्या अपंग प्रवर्गाकरिता पद/पदे नियुक्तीकरीता योग्य ठरविण्यात (Identified) आली आहेत, त्याच पदांपुरते हे आरक्षण मर्यादित असेल. अपंग प्रवर्गातील संबंधीत व्यक्ती पदोन्नतीचे पद समर्थपणे धारण करू शकत असेल तरच हे आरक्षण कार्यान्वित होईल.

जर समुचित अपंग प्रवर्गातील व्यक्ती, मूळ श्रेणीत (Feeder grade) पुढील उच्च श्रेणीतील अपंगासाठी नियुक्तीकरीता योग्य ठरविलेल्या पदावरील (Identified Posts) पदोन्नतीसाठी उपलब्ध होत नसेल तर परस्पर अदलाबदलीस (Inter se exchange) खालील अटींच्या अधिन राहून परवानगी देण्यात यावी.

(एक) ज्या पदावर पदोन्नती द्यावयाची आहे त्या पदाच्या मूळ श्रेणीत (Feeder Grade), त्या अपंग प्रवर्गातील व्यक्ती उपलब्ध असली पाहिजे,

(दोन) अशा प्रकारे अदलाबदल करण्यात आलेले आरक्षण पुढील तीन भरती वर्षापर्यंत पुढे ओढण्यात येईल व तद्नंतर हे आरक्षण व्यपगत (Lapse) होईल."

---